वि.दि.दा. क्र.९/२०१७
गंगाधर वि. संभाजी
वादी तर्फे सा.क्र.५
(नि.क्र.४४४)



**माझे नाव –** संतोष धोंडू खैरनार **,वय –** ५८ वर्षे**,**
**धंदा -** मजूरी**, रा.** सटाना ता.जि.नाशिक.

**वादीतर्फे सरतपास श्री.व्ही.एस.शेळके वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

**१.** बापू जाधव यांना मी ओळखतो. मी त्यांच्याकडे पूर्वी जात असे. डाळिंब छाटणीचे काम मी त्यांच्याकडे करत असे. बापूकडे ब-याच प्रकारची फळझाडे आहेत. मी बापूकडे काम करत असताना कोपरा गावातील गंगाधर देपे यांच्याकडे कामाला जाल का असे बापूने मला सांगितले. मी त्याठिकाणी गेलो. मी त्यांच्याकडे डाळिंबाची पहिली छाटणी केली. साधारण ६५ ते ७० एकर डाळींब बाग होती. माझ्याकडे २५ मुलांची टिम होती. त्यांच्याकडे हाडबे नावाचा मुकदम होता. तो आमची वयवस्था करायचा. त्यांच्याकडे आणखी गावातील २,४ लोक होती. रोपांना रींग टाकणे, खते घालणे मी जाधव साहेबांच्या सांगण्यावरुन करत होतो. असे मी काम ७ ते ८ वर्षे केले. जाधव साहेबांच्या सांगण्यावरुन छाटणी, फवारणी करत असे गंगाधर देपे यांचे काम करत होतो. या ६५ -७० एकर बागेव्यतीरीक्त अन्य डाळिंबाची पीके दिसली नाही. आम्ही काम करत असताना आम्हाला कोणीही हरकत अडथळा केला नाही. पहिल्या वर्षी बागेला कुंपन नव्हते, मात्र नंतर ते केले.

**सरतपास पूर्ण.**

**प्रतिवादी १ ते ५ तर्फे श्री. बी.एन.पौळ वकिल यांच्यामार्फत उर्वरीत सरतपास शपथेवर सुरु.**

**२.** हे खरे की, मला कोर्टाची समन्स नाही. हे खरे की, मी बापू जाधवासोबत आलो. हे खरे नाही की, त्यांच्या सांगण्यानुसार मी आज रोजी साक्ष देत आहे. सन २००३ च्या पासून पुढे आठ नऊ वर्षे मी सदर काम केले. साधारण २३ ते २४ हजार डाळिंबाची झाडे तिथे होती. सात महिन्यातून एकदा तिथे मी जात असे. छाटणीचे वर्षात तीन बहार असतात. आंबे बहार उन्हाळयात असतो. दुसरा हस्त बहार थंडीच्या दिवसात असतो. मृग बहार हा तिसरा बहार

आहे. गंगाधर यांना किती भाऊ याची मला माहिती नाही. ६५-७० एकर जमीन कोणाची होती हे मला माहिती नाही. गंगाधर यांच्या भावांची व माझी भेट कधी झाली नाही. गंगाधर व त्यांचे भाऊ एकत्र होते की विभक्त होते हे मला माहिती नाही. गंगाधर यांच्या ७० एकर जमीनीशिवाय चिखली रस्त्याला आणखी काही जमीन होती काय याची मला माहिती नाही. वादीचा मुनीम आम्हाला मजूरी दयायचा. डाळिंबाचे पीक हे सहा महिन्याचे असते. ६०-६५ एकर जमीनीचा मालक कोण होते हे मला सांगता येणार नाही. लागवड करताना मी नव्हतो. कुंपण कोणी केले हे मला माहिती नाही. हे खरे नाही की, मी बापू जाधव यांच्या सांगण्यावरुन खोटे बयान देतो. हे खरे की, मला फोन आल्यामुळे मी साक्षीला आलो. मी सांगतो की, तिथे मी काम केले.

**उलटतपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**
**फेरतपास नाही.** समक्ष

**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक १६/०१/२०२६.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**